**वाचले :—** **०१.** जिल्हा न्यायालय, नांदेड कार्यालयीन आदेश क्र. आस्था/ ब—४(१)/ ३५१३/ २०२०, दिनांक ३१.०७.२०२०.
**०२.** नांदेड जिल्हा न्यायिक विभागाच्या सल्लागार समितीच्या दिनांक १५.०९.२०२० रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

— — — — — — —

## —:: कार्यालयीन आदेश ::—

ज्याअर्थी, संदर्भात अ.क्र. १ येथे नमूद आदेशानुसार नांदेड जिल्हा न्यायिक विभागाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीकाच्या रिक्त पदांवर दिलेल्या प्रथम नियुक्तीनुषंगाने, निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ७९ वरील उमेदवार श्री चंद्रभान लिंबाजी पंढरकर, अ.क्र. ८० वरील उमेदवार श्री राजेश सदाशिव तेलेवार आणि अ.क्र. ८१ वरील उमेदवार श्रीमती अर्चना दामोधर कदम हे आपआपल्या प्रथम नियुक्तीच्या ठिकाणी, आदेशाची बजावणी झाल्यापासून विहित एक महिन्याच्या कालावधीत, रुजू झाले नाहीत,

आणि ज्याअर्थी, संदर्भात अ.क्र. २ येथे नमूद सल्लागार समितीच्या बैठकीत, सदर उमेदवार आपल्या प्रथम नियुक्तीच्या पदावर विहित एक महिन्याच्या कालावधीत रुजू न झाल्यामुळे त्यांना दिनांक ३१.०७.२०२० रोजीच्या आदेशानुसार दिलेली प्रथम नियुक्ती रद्द करण्यात येऊन त्यांची नावे निवड / प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे,

त्याअर्थी, मी, सुभाष शे. खरात, प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड याद्वारे —

(१) निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ७९ वरील उमेदवार श्री चंद्रभान लिंबाजी पंढरकर यांची दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, किनवट या न्यायालयाच्या आस्थापनेवर दिलेली प्रथम नियुक्ती,

(२) निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ८० वरील उमेदवार श्री राजेश सदाशिव तेलेवार यांची जिल्हा न्यायालय, नांदेडच्या आस्थापनेवर दिलेली प्रथम नियुक्ती, आणि

(३) निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ८१ वरील उमेदवार श्रीमती अर्चना दामोधर कदम यांची जिल्हा न्यायालय, नांदेडच्या आस्थापनेवर दिलेली प्रथम नियुक्ती —

याद्वारे तात्काळ प्रभावाने रद्द करीत असून पुढे निर्देशित करतो की, वर नमूद तीन उमेदवारांची नावे नांदेड जिल्हा न्यायिक विभागासाठीच्या कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतून तात्काळ प्रभावाने वगळण्यात यावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :— १५.०९.२०२०. )

15/9/2020.
(सुभाष शे. खरात)
प्र. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

— — — — — — —

पृष्ठांकन क्र/आस्था/ब–४(१)/ 4179 /२०२०.

**प्रतिलिपी, माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव –**

०१. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, किनवट.
०२. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०३. सहाय्यक अधिक्षक, वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०४. संबंधीत उमेदवारांना, **" नोंदणीकृत पोंच देय डाकेने "**
०५. आदेशाची एक प्रत या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :– १५.०९.२०२०. )

**प्र. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**
15/9/20.